**॥ श्री ॥**

**गुरु कुम्हार शिष कुंभ है,**
**गढ़ि गढ़ि काढ़ै खोट।**
**अन्तर हाथ सहार दै,**
**बाहर बाहै चोट।।**

**संत कबीर म्हणतात, गुरू कुंभार आहे तर शिष्य कुंभ आहे. कुंभार बारीक बारीक दोष शोधून मडक्याला आकार देतो, त्याप्रमाणे गुरूही शिष्याला घडवत असतो. फरक मात्र एवढाच आहे की कुंभाराला एक मडकं तयार करायला काहीच दिवस पुरतात, तर शिष्याला घडवायला गुरूला अनेक वर्षांची अथक मेहनत घ्यावी लागते. आणि म्हणूनच ब्रह्मा- विष्णु- महेश या त्रिशक्तीचा वास असलेला गुरू आपल्याला कायमच पूजनीय असतो.**

**आपल्या भारतीय संस्कृतीतही गुरूशिष्य परंपरेला अनन्यसाधारण महत्व आहे. संगीतात तर गुरूशिष्य परंपरा हा आत्माच होय. जास्तीत जास्त गुरूच्या सहवासाचा लाभ घेऊन ज्ञानार्जन करणे आणि एक शिष्य म्हणून स्वतःचा विकास करणे, हीच आपली परंपरा. मात्र ही गुरूपरंपरा काळाप्रमाणे बदलत चालली आहे, हे आपल्याला मान्य करायला लागेल. पण तरी, हजारो वर्षांची ही परंपरा तितक्याच तन्मयतेने, निष्ठेने जोपासणारे जे काही थोडे बहुत गुरुजन आहेत, त्यापैकी तालयोगी पद्मश्री पंडित सुरेश तळवलकरजी यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल.**

**खरंतर सुरेशजी वर्षानुवर्षे गुरूशिष्य परंपरेतूनच ज्ञान संक्रमित करण्याचे कार्य करत आहेत. त्यांचे अनेक शिष्य आज जागतिक स्तरावर कीर्ती मिळवत आहेत. पण गेल्या 12 वर्षांपासून पुण्यातल्या धायरी इथल्या तालयोगी आश्रमाद्वारे नवी पिढी घडविण्याचे अमूल्य कार्य गुरुजी करत आहेत. जिथे विद्यार्थी वास्तव्यास आहेत आणि दिवसरात्र सुरेशजींच्या मार्गदर्शनाखाली संगीताची साधना करत आहेत. गुरुजींचेच शिष्य श्रीनिवास राव यांनी**

धायरी इथली आपली वास्तु गुरूचरणी अर्पण केली आणि 4 एप्रिल 2011 रोजी करवीर पीठाचे शंकराचार्य श्री. विद्या नृसिंह भारती आणि परमपूज्य विष्णु महाराज पारनेरकर यांच्या शुभ आशीर्वादाने तालयोगी आश्रम या पवित्र वास्तूचे उद्घाटन झाले. गुरुकुल पद्धतीनेगुरुशिष्य परंपरेचा वारसा जपणारा हाच तालयोगी आश्रम यंदा आपली तपपूर्ती करत आहे. निरपेक्ष भावनेने संगीतहितार्थ केलेल्या 12 वर्षांच्या मेहनतीचे फळ म्हणजे हे एक तप.

हजारो वर्षांचे हे पारंपरिक ज्ञान लिखित परंपरेपेक्षा मौखिक परंपरेद्वारे आपल्यापर्यंत येऊन पोहोचलेले आहे. तेही आपली मूल्य न विसरता आणि यासाठी अनेक थोर गुरुजनांनी आपले आयुष्य वेचले आहे. गुरूंचे संस्कार, शिष्याची साधना, शिष्याच्या संवेदनशीलतेला जोपासणारा कलाव्यवहार हेच गुरुशिष्य परंपरेचे मर्म आहे. आणि हाताचे काहीही राखून न ठेवता सुरेशजी परंपरेचे हे मर्म गेली 12 वर्षे गुरुकुलद्वारे जोपासत आहेत. लय- ताल हा संगीताचा आत्मा केवळ शिष्याच्या बुद्धी पर्यंत न पोहोचवता त्याच्या मनाशी एकरूप करण्याचे कसब सुरेशजींकडे  आहे. खरेतर आजकालच्या या धकाधकीच्या जीवनात हा कलाव्यवहार 1-2 तासांचा किंवा आठवड्यातल्या एका दिवसाचा झालेला आहे. मात्र अभिजात संगीताचे स्वरुप पाहता, ही परंपरा काही तासांमध्ये शिकवून कलाकार घडवणे सुतराम शक्य नाही. तेव्हा गुरू शिष्य परंपरेचे महत्व जाणवते. विद्यार्थ्याचा शिष्य आणि शिष्याचा कलाकार कसा होईल यासाठी सुरेशजी कायमच प्रयत्नशील असतात. शास्त्र, तंत्र, विद्या आणि कला या चारही अंगांमागचे तत्त्व समजावून देत, त्याचे संस्कार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची तळमळ सुरेशजींच्या  शिकवण्यात कायमच जाणवते. परंपरेची मूल्य जपत, काळाबरोबर नवीन गोष्टींचा समावेश करत, परंपरा आणि नवता या दोन्ही गोष्टींचा संयोग गुरूजीं मध्ये दिसतो. त्यामुळे लय तालाचे विशेष मार्गदर्शन घेण्यासाठी तबलासाधकच नाहीत तर अनेक नर्तक,  गायक, वादकही या पंढरीस्वरुप गुरुकुलात कायमच येत असतात. तबला, पखावज, संवादिनी, बासरी या भारतीय वाद्यांबरोबरच पाश्चिमात्य वाद्य जेंबे, काहून, कलाबाश, ड्रम्स वाजवणारे वादकही इथल्या संस्कारांची पुंजी

घेत समृद्ध होत आहेत. आणि यानिमित्तानेच एकमेकांना पूरक कलांचे ज्ञान देत, हा तालयोगी आश्रम खऱ्या अर्थाने 'गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते ।' या उक्तीला सार्थ ठरतो. अशा या कलासाधकांच्या पंढरीतून अनेक शिष्य, कलाकार म्हणून नावारूपास आलेले आहेत.

तालयोगी आश्रमात 50 ते 60 विद्यार्थी रोज अखंड ज्ञानार्जन करत आहेत. त्यातले 30-40 विद्यार्थी तिथेच वास्तव्यास आहेत. तालयोगी आश्रमाच्या तपपूर्ती मध्ये गुरुजींबरोबरच आश्रमाच्या विश्वस्तांचेही मोलाचे सहकार्य आहे. त्यामुळेच ही वास्तू आज दिमाखात उभी आहे. अनेक मोठमोठे जागतिक कीर्तीचे कलाकार आवर्जून या वास्तूला भेट द्यायला येतात हे विशेष. शिक्षणाबरोबरच सादरीकरण हाही कलेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यामुळेच आश्रमाद्वारे प्रस्तुत करण्यात येणारा गुरूअभिवादन सोहोळा, आश्रमाचा वर्धापनदिन, बैठक, बाल कलाकारांची गुरुपौर्णिमा असे भव्य दिव्य कार्यक्रम पुणेकरांना कायमच परिपूर्ण संगीताचा आनंद देतात. यंदाच्या वर्षी, कलेचा निरंतर ध्यास असणारे तालयोगी पद्मश्री पंडित सुरेश तळवलकरजी यांचं अमृत महोत्सवी वर्ष आणि तालयोगी आश्रमाची तपपूर्ती हा माणिकांचन योगच म्हटला पाहिजे. अनेक कलाकार, संगीतप्रेमी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे गुरुजींच्या, ओघाने तालयोगी आश्रमाच्या परि स्पर्शाने समृद्ध झालेले आहेत. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्याच्या वैभवात, तालयोगी आश्रमाचा तपपूर्ती सोहोळा म्हणजे मानाचाच तुरा. या सोहोळ्यांतर्गत 4 एप्रिल रोजी सुरेशजींचे सुपुत्र आणि शिष्य सत्यजित तळवलकर यांचे तबला वादन आणि सुरेशजींचे परम मित्र पंडित उल्हास कशाळकर यांचे गायन अशी सांगीतिक मैफिल, बालगंधर्व रंगमंदिरात रंगणार आहे. तरी आस्वादक त्याचा जरूर लाभ घेतील यात शंका नाही. पंडितजी आणि तालयोगी आश्रम या गुरुकुलाचा हा कलाप्रवास, असाच वृद्धिंगत होवो आणि कलासाधकांना पूर्णानंदाची अनुभूती देत राहो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना.